# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २४/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### अपहरण करून ७ लाख रूपयाची खंडणी मागणारे आरोपी जेरबंद
### पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी ची कारवाई

दि. २३.०६.२०२२ रोजी पो.स्टे. एमआयडीसी बोरी ला फिर्यादीने रिपोर्ट दिली की संशयीत आरोपी क्र. १. आकाश महेश सोनवाने, वय १७ वर्ष, रा. गणेशपुर, एमआयडीसी बोरी व २. संकेत महादेव ठाकरे, वय २२ वर्श, रा. टेंभरी, एमआयडीसी बोरी यांनी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय ४ वर्ष हिला ती तिच्या घरातील अंगणात खेळत असतांना तिला चॉकलेट देवून तुला आणखी मोठ चॉकलेट देतो असे आमिश दाखवून तिला आपल्या मोटर साकल वर बसवून पळवून नेले. अशी पो.स्टे. ला माहिती दिली असता पोलीस स्टेशन ठाणेदार यांनी तात्काळ वरीष्ठांना माहिती देवून संशयीत आरोपीचे मोबाईल लोकेशन प्राप्त करून संबंधीत लोकेशनवर तीन ते चार कर्मचारींचे टिम करून पाठवून दिले. तेवढ्यात संशयीत आरोपी याने अनोळखी नंबर वरून फिर्यादीला फोन केला कि तुझी मुलगी माझा ताब्यात आहे. तु मला ‘ सात लाख रूपये दे अन्यथा तुझा मुलीस जिवानीशी मारून टाकू‘अशी खंडणीची मागणी केली. तेव्हा पोलीसांनी फिर्यादीस आरोपीला फोन कॉल करून खंडणीबाबत वाटाघाटी करत फोन जास्तीतजास्त वेळ चालु ठेवनेबाबत सांगीतले. तेव्हा पुन्हा आरोपीचे लोकेशन प्राप्त करून संबंधीत ठिकाणी आरोपीला कोणताही संशय येणार नाही अशा प्रकारे कर्मचा—यांची टिम रवाना करून दिले असता सदर कर्मचा—यांनी पिडीत मुलीस आरोपीकडुन कोणताही धोका होणार नाही अशा पद्धतीने आरोपी लपून बसलेल्या ठिकाणी जावून आरोपीवर अचानकपणे झडप घालून सदर अल्पवयीन मुलीस सुरक्षीतपणे ताब्यात घेवून तिस तिच्या आई वडिलांचे ताब्यात घेवून आरोपीस तात्काळ अटक करण्यात आले.

सदर गन्हयाचे तपासात मा. पोलीस अधीक्षक साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना माहिती देवून त्यांच्या मार्गदर्शना खाली तपास पथक तयार केले. व मोठे सिताफिने तांत्रीक मदतीने सदर प्रकरणातील अपहरण केलेल्या अल्पवयीन मुलीस यशस्वीरित्या आरोपीच्या ताब्यातून सुटका केली. पोलीसांनी पिडीत अल्पवयीन मुलीसह डोंगरगाव येथुन ताब्यात घेवून पो.स्टे. ला परत आल्यावर आरोपीचे विचारपुस केली असता सुरूवातीस उडवाउडवीचे उत्तर देवून लागला त्यास पोलीस खाक्या दाखविल्या असता त्यानी गुन्हयाची कबुली दिली. त्याचे सहकारी मित्र संकेत अनिल ठाकरे रा. टेंभरी हा सुद्धा सहभागी असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीचा शोध घेवून त्यास सदर गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. सदर आरोपीने लहान मुलीला चॉकलेट चे आमिश दाखवून आई वडिलाच्या रखवालीतुन पळवून घेवून गेला. व त्या बदल्यात खंडणीची मागणी केली होती.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा गायकवाड,यांचे मार्गदर्शनात पोनि अशोक कोळी, पोउपनि रामेश्वर राय, डीबी पथकाचे पोहवा इकबाल ेख, प्रफुल राठोड, किशोर डेकाटे, रमेश नागरे तसेच पोहवा भास्कर मेटकर, दिप पांडे, प्रविण सिराम, अमोल कोठेवार, नापोशि रोशन बावणे, मनापोशि वंदना सारवे,मनापोशि सुषमा धनु कार तसेच सायबर सेल नागपूर ग्रामीण चे पोलीस अंमलदार सतिश राठोड यांनी तात्काळ गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून आरोपीस व पिडीतास दोन तासाचे आत ताब्यात घेवून गुन्हया उघडकिस आनला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि रामेश्वर राय हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर